# वैद्यकिय व अभियांत्रिकी पूर्वप्रवेश परिक्षा वर्गासाठी देगलूर महाविद्यालयात परीक्षा पार पडली

देगलूर (प्रतिनिधी) :-

येथील अडत व्यापारी शिक्षण संस्था संचलित देगलुर महाविद्यालय देगलुर येथे वैद्यकीय व अभियांत्रिकी पूर्व प्रवेश परिक्षा वर्ग चालविले जातात. आगामी वर्ग प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांसाठी प्रवेश परिक्षा दि २९डिसेबंर रोजी घेण्यात आली यास उदंड प्रतिसाद मिळालाआहे



देगलूर महाविद्यालय हे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची शैक्षणिक गरज विचारात घेऊन १९६३ मध्ये स्थापन करण्यात आले, तेव्हापासून आजतागायत सामाजिक बांधिलकीतून संस्थेतील पदाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शक विचारातून नवनवीन उपक्रम महाविद्यालयात राबविण्यात येतात. त्यातील एक उपक्रम कोटा (राजस्थान) येथील तज्ञ शिक्षकांच्या टीम मार्फत मागील वर्षांपासून गएए छएएढ अभियांत्रिकी, वैद्यकीय प्रवेश परिक्षेचे नियमीत वर्ग घेण्यात येत आहेत. शैक्षणिक वर्ष २०२५.२६ साठीचीनवीन बॅच येत्या १५मार्च पासून सुरुवात होणार आहे. त्या अनुषंगानेच महाविद्यालयात चालत असलेले विविध उपक्रमाबद्दल माहीती देण्यासाठी विज्ञान शाखेचे शिक्षक विविध शाळेला भेट देऊन दहावीच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले होते . देगलुर महाविद्यालय देगलूर येथे मार्चमध्ये गएए/ छएएढ तसेच जून मध्ये अकरावीत प्रवेश घेण्यासंदर्भात आवाहन करण्यात आले होते या प्रवेशाच्या अनुषंगाने गएए/छएएढ प्रवेश पूर्व परिक्षा २९डिसेंबर २०२४रोजी देगलुर महाविद्यालय देगलूर येथे सकाळी ठीक ११वा घेण्यात आली आहे यात एकूण २८१ विद्यार्थिनी सहभाग घेतला. या परीक्षेत ८०%पेक्षा जास्त मार्क्स घेणाऱ्यां विद्यार्थ्यांस १००% 'शिकवणी फीस' माफ असेल अशी माहीती प्राचार्य डॉ. मोहन खताळ यांनी दिली. तरी दहावीत शिकत असलेल्या विद्यार्थ्यांनी (गएए/ छएएढ ) वर्ग परिक्षा दिली यात शहरातील तसेच आजुबाजूच्या गावातील अनेक शाळेतल्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला अशी माहिती प्राचार्य डॉ मोहन खताळ, उपप्राचार्य (वरीष्ठ) डॉ.अनिल चिद्रावार, क.म.चे उपप्राचार्य प्रा.चमकुडे एम. एम.(कला, वाणिज्य)डॉ.व्हि जी शेरीकर (विज्ञान) पर्यवेक्षक एस एन पाटील जे पी चंद्रा, दत्तपसन्न साखरे आदि कर्मचारी परीक्षेचे नियोजन केले होते.

Scanned with OKEN Scanner